अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा. क्र.अतिमआ(ज)/उआसाप्र/आस्था/ २६७६
दिनांक : २९/०८/२०१५

## कार्यालय परिपत्रक

**विषय** : लेखनिकी संवर्गातील सेवकांना सुधारित अश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजूर करणेबाबत.

**संदर्भ** : १) जावक क्रमांक अतिमआ (वि)/उआसे/१५९० दि.२९/०६/२०१३
२) जावक क्रमांक (ज)/उआसे/३२४५, दि. २०/०९/२०१३
३) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) ठराव क्रमांक १/४३४, दि. २९/०८/२०१५

एकाच पदावर १२ वर्षे / २४ वर्षे नियमित सेवा झाल्यानंतर बढती प्राप्त न झालेल्या कर्मचाऱ्यांना, बढतीचा लाभ न मिळाल्याने बढतीची आर्थिक वित्तलब्धी न मिळाल्याने ती भरून काढण्यासाठी, शासनाचे धर्तीवर पुणे महानगरपालिकेतील सेवक/अधिकारी यांना सुधारित सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याविषयी कार्यालय परिपत्रक संदर्भ क्र. १ व २ अन्वये प्रसृत करण्यात आले आहे.

सदर योजनेअंतर्गत ज्या पदाची वेतन संरचना मंजुर करण्यात येणार आहे त्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळण्यासाठी विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक असल्याने जे सेवक खात्याअंतर्गत विभागीय परिक्षा उत्तीर्ण नाहीत असे सेवक सुधारित सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या दुसऱ्या लाभापासून वंचित राहत आहेत.

पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ यामध्ये ''कोणत्याही दिनांकास कर्मचारी ४५ वर्षे वयाचा झाल्यानंतर त्यास परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल'' अशी तरतूद आहे. सबब संदर्भ क्रमांक १ व २ चे कार्यालय परिपत्रकान्वये सुधारित आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लेखनिकी संवर्गातील सेवकांना दुसरा लाभ मंजूर करणेबाबत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

१) सुधारित अश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ देताना लेखनिकी संवर्गातील लिपीक टंकलेखक (ज्यु.ग्रेड.लेखनिक) व वरिष्ठ लिपीक (सि.ग्रेड.लेखनिक) या पदावरील सेवकांना त्यांचे वयास ज्या दिनांकास ४५ वर्षे पुर्ण होतील त्या दिनांकास विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्याची अट शिथिल करून सुधारित अश्वासित प्रगती योजनेच्या नियमांनुसार दुसऱ्या लाभाचे फायदे देण्यात यावेत.

२) विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्याची अट शिथिल करून सुधारित अश्वासित प्रगती योजनेच्या दुसऱ्या लाभाचे अनुज्ञेय फायदे मिळणेसाठी सेवकाने लिपीक टंकलेखक (ज्युनिअर ग्रेड लेखनिक) या पदावर त्याचे नियुक्तीचे वेळी विहित केलेली अर्हता, इंग्रजी/मराठी टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. महापालिका प्रशासनाने

वेळोवेळी सुधारित केलेल्या किमान पात्रता, जसे एम.एस.सी.आय.टी., विभागीय परिक्षा, एल.एस.जी.डी. परीक्षा इ. उत्तीर्ण होण्यास दिलेली शिथिलता वगळता इतर सर्व प्रकरणी लिपीक टंकलेखक पदाच्या विहित अटी पूर्ण करणे आवश्यक राहिल.

३) पुणे महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ दि.०४/०९/२०१४ पासून अंमलात आले आहेत. सुधारित अश्वासित प्रगती योजने अंतर्गत दि.०१/१०/२००६ ते ३१/०३/२०१० या कालावधीत सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना या योजने अंतर्गत दुसरा लाभ अनुज्ञेय नाही. त्यानुषंगाने दि.०१/०४/२०१० ते दि.०३/०९/२०१४ अखेर पर्यंत दुसऱ्या लाभास पात्र ठरणाऱ्या लेखनिकी संवर्गातील सेवकांना विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्याची अट शिथिल करून सुधारित अश्वासित प्रगती योजनेचे नियम, पात्रता व कार्यपध्दतीनुसार दुसरा लाभ मंजूर करावा.

४) वरील विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणेपासून शिथिल केलेली अट केवळ सुधारित अश्वासित प्रगती योजनेचे लाभासाठी सेवक पात्र होण्यापुरतीच मर्यादित राहिल, इतर कोणत्याही प्रकरणी याचा आधार घेता येणार नाही.

तरी, वरील आदेश विचारात घेऊन पुणे महानगरपालिकेतील लेखनिकी संवर्गातील कर्मचारी यांना सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजूर करणेबाबत जरूर ती पुढील तजविज संबंधित खातेप्रमुख यांनी करावयाची आहे.

(राजेंद्र जगताप)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
पुणे महानगरपालिका

प्रतः सर्व संबंधित खाते प्रमुख/महा. सहा. आयुक्त/प्रशासन अधिकारी
यांजकडेस जरूर त्या पुढील कार्यवाहीसाठी

(मंगेश जोशी)
**उप आयुक्त (सा.प्र.)**
पुणे महानगरपालिका